अति. महापालिका आयुक्त (ज) कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:-अतिमआ/साप्रवि/आस्था/3042
दिनांक : ०६/०८/२०२०.

आदेश

विषय : कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.
पुणे महानगरपालिकेचे Covid care center (CCC) येथील कामकाजाकरिता एकवट वेतनावर, तात्पुरत्या स्वरुपात "डाटा एन्ट्री ऑपरेटर" नियुक्त करणेबाबत.

संदर्भ : १) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२०.
३) जाहिरात क्र.१/१९४ दि.०९/०७/२०२०
४) मा. महापालिका आयुक्त (ज), ठराव क्र.१/१९७, दिनांक २७/०७/२०२०.

संदर्भ क्र. १ चे अधिनियमांतील भाग ६ - स्थानिक प्रशासन, नियम ४१ (२) नुसार स्थानिक प्रशासनास आपत्ती व्यवस्थापन कार्यास आवश्यक वाटेल अशा उपाययोजना करण्याचे अधिकार आहेत. संदर्भ क्र. २ चे महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० मधील १० (ऐ) नुसार मा.महापालिका आयुक्त यांना त्या भौगोलिक क्षेत्रामधील सर्व शासकीय विभाग/संस्थांच्या आस्थापनेवरील किंवा निर्देशित करतील अशा कोणत्याही व्यक्तींच्या सेवा कोव्हीड १९ या रोगाचे नियंत्रण/प्रतिबंधात्मक/आपत्कालीन उपाययोजना करण्याचे कामासाठी अधिग्रहित करता येतात.

या तरतुदी विचारात घेऊन Covid care center (CCC) येथील कामकाजाकरिता एकवट वेतनावर, तात्पुरत्या स्वरुपात "डाटा एन्ट्री ऑपरेटर" नियुक्त करणेस संदर्भ क्र. ३ अन्वये अर्ज मागविलेले होते. त्यामधून इतर अर्हता व इंग्रजी टंकलेखन चाचणी परीक्षेचे संदर्भ क्र. ४ अन्वये मंजूर गुणवत्ता यादीनुसार खालील उमेदवारांची निवड केलेली आहे. या उमेदवारांचे **सात दिवसांचे कामकाजाचा आढावा घेऊन** ते समाधानकारक असल्यास **एक महिना पूर्णहोईपर्यंत कालावधीसाठी** नियुक्ती केलेली आहे. या उमेदवारांच्या सेवा आरोग्य विभागाकडील तात्पुरत्या आस्थापनेवर राहतील. संबंधित उमेदवारांनी त्यांचे नावासमोर नमूद Covid care center (CCC) कामाजाचे ठिकाणी हजर होऊन, तेथील नियंत्रक अधिकारी सांगतील ते कामकाज करावे.

अ.क्र.	उमेदवाराचे नाव	संपर्क क्रमांक	नियंत्रक कार्यालय
1	INGAWALE SAMEER SOMNATH	7709577077	परिमंडळ क्र. ३
2	Suvarnkar Sagar Arun	9881566817	पुणे स्मार्ट सिटी कार्यालय, सिंहगड रोड, पुणे
3	Komal Vijay Taware	9075576574	परिमंडळ क्र. २
4	OMKAR KESHOR SASANE	8668263522	पुणे स्मार्ट सिटी कार्यालय, सिंहगड रोड, पुणे
5	Yogesh Jalindar Veer	8055119999	ढोले-पाटील क्षेत्रिय कार्यालय, राजर्षी शाहू महाराज पथ, पुणे

अ.क्र.	उमेदवाराचे नाव	संपर्क क्रमांक	नियंत्रक कार्यालय
6	Rahul Shankar Bhingare	8554874383	पुणे स्मार्ट सिटी कार्यालय, सिंहगड रोड, पुणे
7	Pooja Ashok Kamble	9552301953	पुणे स्मार्ट सिटी कार्यालय, सिंहगड रोड, पुणे
8	Shubhangi Subhash Gholap	7040490293	पुणे स्मार्ट सिटी कार्यालय, सिंहगड रोड, पुणे
9	Amruta Chandrakant Shendage	8378908228	धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय, स्व.राजीव गांधी प्राणी संग्रहालय समोर, कात्रज, पुणे
10	PRADIP SARANGDHAR SHIRSATH	9730571157	पुणे स्मार्ट सिटी कार्यालय, सिंहगड रोड, पुणे
11	Eknath Panditrao Bhise	8975975978	पुणे स्मार्ट सिटी कार्यालय, सिंहगड रोड, पुणे

अटी व शर्ती :

१) नियुक्ती पत्र प्राप्त झाल्यावर पुढील २४ तासात उमेदवाराने वरील नियुक्तीचे ठीकाणी हजर होऊन नियंत्रण करणाऱ्या अधिकारी यांना नियुक्ती पत्रासह व लेखी रुजू रिपोर्ट द्यावा, नियंत्रण करणाऱ्या अधिकारी यांनी एकत्रित अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

२) **संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी उपरोक्त उमेदवारांनी दररोज किती डाटा एन्ट्रीचे कामकाज बिनचूक पूर्ण केले याबाबत दैनंदिन नोंदी ठेवाव्यात, त्यांचे संगणकावरील Excel sheet, ई - मेल इत्यादी कामकाज, वर्तणूक, उपस्थिती याबाबत नोंदी/आढावा घ्यावा आणि सात दिवसानंतर उमेदवार नियुक्ती पुढे चालू ठेवण्याचे योग्यतेचा अगर कसे याबाबत नाव व पूर्ण केलेल्या डाटा एन्ट्री कामकाजाचे प्रमाणासह स्पष्ट शिफारस सामान्य प्रशासन विभागास establishment@punecorporation.org या ई-मेलवर पाठवावी.**

३) उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती त्यांचे स्वतःचे आवेदन पत्रात सादर केलेली माहिती, सादर केलेली कागदपत्रे प्रमाणित असल्याचे मानून केलेली आहे, दिलेली माहिती/कागदपत्रे नंतर केव्हाही असत्य आढळल्यास त्याचे परिणामांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची असेल.

४) आपली आपत्कालीन परिस्थिती संपुष्टात येईपर्यंत अथवा या आदेशांचे दिनांकापासून एक महिनापर्यंत कामकाजासाठी सदर नियुक्ती केलेली आहे, याकामी आपणास रुपये १९,२५०/- एकवट मासिक वेतन अनुज्ञेय राहील, इतर कोणताही भत्ता, सवलत अनुज्ञेय होणार नाही. साप्ताहिक सुटी वगळता अनुपस्थितीचे वेतन कपात करण्यात येईल.

५) उपरोक्त उमेदवारांचे **वेतन आरोग्य विभागाने अदा करावयाचे** आहे, संबंधित नियंत्रक यांनी याकामी उमेदवारांचा उपस्थिती अहवाल दरमहा आरोग्य विभागास पाठवावा.

६) पुणे महानगरपालिकेकडील प्रचलित पद्धतीनुसार या उमेदवारांचे एक महिन्याचे वेतन अनामत घेण्यात येऊ नये, तसेच उमेदवारांसोबत करारनामा करू नये.

७) संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी उमेदवारांचे या आदेशातील सर्व अटी व शर्ती, तसेच करारावरील नियुक्त्यांबाबत वेळोवेळीचे शासन निर्णय/निर्देश मान्य करून तात्पुरत्या सेवेत

रुजू होत असल्याबाबत साध्या कागदावर बंधपत्र घेऊन वेतनाचे-आरोग्य विभागाकडे सादर करावे.

८) या नियुक्तीचे सेवेमुळे उमेदवारास अन्य कोणत्याही पदावर नियुक्ती मिळण्याचा अथवा समावेशनाचा अधिकार प्राप्त होणार नाही.

९) या उमेदवारांना प्रत्येक सप्ताहात एक साप्ताहिक सुटी दिली जाईल, त्याव्यतिरीक्त त्यांनी प्रत्येक कामकाजाचे दिवशी व ठरवून दिलेल्या वेळेतच काम करणे आवश्यक असेल.

१०) उमेदवारांस सेवामुक्त होण्यापूर्वी एक महिन्याची लेखी पूर्वसूचना नियंत्रक अधिकारी यांचे मार्फत द्यावी लागेल.

११) महानगरपालिका प्रशासनास आवश्यकता वाटल्यास उमेदवारांचा नियुक्तीचा कालावधी वाढविला जाऊ शकतो किंवा कमी सुद्धा केला जाऊ शकतो.

१२) नियुक्त केलेले उमेदवार दिलेले काम योग्य प्रकारे करीत नसल्याचे किंवा त्यांनी केलेले काम परिपूर्ण तथा दर्जात्मक नसल्याचे, वर्तन चांगले नसल्याचे आढळल्यास त्यांची सेवा घेणे मा.आरोग्य अधिकारी यांना रद्द करता येईल.

१३) नियुक्त उमेदवार पुणे महानगरपालिका प्रशासनाचे वतीने काम करीत असल्याने या उमेदवारांनी आपले वर्तन सौजन्याचे व नि:संशयपणाचे ठेऊन शासन/पदाधिकारी, शहरातील नागरिक/रुग्ण यांचेमधील पुणे महानगरपालीकेची प्रतिमा मलिन होणार नाही यांची दक्षता घ्यावी.

१४) उमेदवारांना त्यांचे कामकाजाची, सुरक्षेची आवश्यक वाटतील अशी साधने (उदा. पेन, स्टेशनरी, मास्क, कॅप, सॅनीटायझर, साबण इ.), तसेच **"तात्पुरते ओळखपत्र"** Covid care center (CCC) येथील नियंत्रक अधिकारी यांनी प्राधान्याने उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी. पुरविलेल्या सुरक्षा साधनांचा उमेदवारांनी वापर करणे सक्तीचे आहे.

१५) नियुक्त केलेले उमेदवार यांनी त्यांचेकडे सोपविलेल्या कामकाजाबाबत नागरिक, प्रसिद्धी माध्यमे यांचेकडे कोणतीही चर्चा/टिप्पणी करू नये, Covid care center (CCC) येथे कोणतीही फोटोग्राफी, व्हिडिओ शुटींग करू नये. तसेच त्यांना सोपविलेले सर्व साहित्य, कागदपत्रे, ओळखपत्र इ. त्यांचे नियंत्रक अधिकारी यांचेकडे सुपूर्त करून मगच त्यांनी कार्यमुक्त व्हायचे आहे.

१६) उपरोक्त उमेदवारांना तीनही शिफ्टमध्ये आणि जेथे नियुक्ती होईल तेथे काम करावे लागेल, त्यास नकार दिल्यास सेवा संपुष्टात आणली जाईल.

१७) नियुक्त केलेले उमेदवार उपरोक्त अटी व शर्ती वाचून व मान्य करून रुजू झालेले आहेत, असे समजण्यात येईल.

(रुबल अग्रवाल)
अति. महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका

प्रत – सर्व संबंधित खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका

प्रती – सर्व संबंधीत उमेदवार,